# महिला उद्योजकतेच्या माध्यमातून महिला सबलीकरण

**डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे**
गृह–अर्थशास्त्र विभाग
एफ.ई.एस. गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर

---

***सारांश :***

*विद्यमान आधूनिक व खुल्या अर्थव्यवस्थेच्या युगात औद्योगिक क्षेत्रात अनेक स्त्रिया उद्योजक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये एकंदरीने पुरूषांचे वर्चस्व असले तरी स्त्रियांनीही, उद्योजकतेची निकोप वाढ व्हावी, याकरिता प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे योगदान केले आहे. अलिकडे विकसित व विकसनशील अशा दोन्ही समजामध्ये स्त्रिया स्वत: पुढाकार घेऊन उद्योजकाची भूमिका पार पाडण्यासाठी सिद्ध झाल्या आहेत. आज स्त्री उद्योजक ही एक वास्तवता आहे. महिलांच्या प्रगतीसाठी भारत सरकारने अनेक पावले उचलली आहेत. पण काही स्त्रीया या योजनेपासून अनभिज्ञ आहेत. प्रत्येक स्त्रीने आर्थिकदृष्टया सक्षम होणे ही आजच्या काळाची गरज आहे 'बचत गट' ही संकल्पना एक सर्वसमावेश असून या माध्यमाने ग्रामीण आणि शहरी महिलांना व्यवसायामध्ये मोठया प्रमाणात प्रगतीसाठी वाव मिळाले आहे. औद्योगिक क्षेत्रात स्त्रिया आपले स्थान निर्माण करू लागल्या आहेत. पाश्चिमात्य देशाप्रमाणेच भारतातही महिला उद्योजकांची संस्था वाढत आहे. संपूर्ण क्षेत्रामध्ये महिलांचे अधिराज्य असल्यामुळे महिला उद्योजकाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण झाल्याचे निर्देशनास येते.*

---

**बीजशब्द :** उद्योजक– नविन उद्योग सुरू करनारा, सक्षमीकरण–सबलीकरण.

**प्रस्तावना:**

अगदी प्राचीन काळापासून तथाकथित उद्योगक्षेत्र हे स्त्रीच्या दृष्टीने एक उपेक्षित क्षेत्र मानले गेलेले आहे. उद्योजकता हा पुरूषांचा प्रांत आहे, पुरूषांच्या कर्तृत्वाकरिता राखून ठेवलेले क्षेत्र आहे, अशी धारणा पूर्वी होती. पण अलिकडच्या ३/४ दशकांच्या कालखंडात, वादळाच्या वेगाने अनेक बदल घडून आलेले आहेत. बदल घडून येण्याची ही प्रक्रिया अजूनही सुरू आहे. विद्यमान आधूनिक व खूल्या अर्थव्यवस्थेच्या युगात औद्योगिक क्षेत्रात अनेक स्त्रिया उद्योजक म्हणून महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. ''एखाद्या उद्योगाची स्थापना करून त्याचे संचलन करणारी व त्या उद्योगाला यशस्वी करण्यासाठी विविध कार्याची जबाबदारी पार पाडणारी स्त्री म्हणजे स्त्री–उद्योजक.''

उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये एकंदरीने पुरूषांचे वर्चस्व असले तरी स्त्रियांनीही, उद्योजकतेची निकोप वाढ व्हावी,याकरिता प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, आपल्या परीने, योगदान केले आहे. प्रत्येक यशस्वी उद्योजकामागे निश्चितपणे एक स्त्री असते. स्त्रिया महत्वकांक्षी, पुरूषांना उद्योजक बनण्याकरिता प्रवृत्त करतात. त्यांना या क्षेत्रात मोठमोठी आव्हाने स्वीकारण्याकरिता अभिप्रेत करतात. अलिकडे विकसित व विकसनशील अशा दोन्ही समाजामध्ये स्त्रिया स्वत: पुढाकार घेऊन उद्योजकाची भूमिका पार पाडण्यासाठी सिद्ध झाल्या आहेत. आज स्त्री उद्योजक ही एक वास्तवता आहे.

अलीकडच्या काळात महिला सक्षमीकरणाचे वारे वेगाने वाहते आहे. स्त्रिया देखील चाकोरी बाहेर पडून स्वत:ला सिद्ध करून यशाचे एकेक शिखर गाठत आहेत. प्रत्येक आव्हानावर मात करण्यासाठी स्वत:ला सक्षम बनविण्याकडे त्यांचा जास्त कल दिसून येतो आहे. त्यातला त्यात महत्त्वाचे म्हणजे तिला घरून याकरिता

पाठिंबा मिळतो आहे हे चित्र फार आश्वासक आहे. शिवाय आणखी एक कौतुकास्पद गोष्ट म्हणजे आता महिलांच्या या प्रगतीच्या वाटचालीत महिलांना आणखी सशक्त करण्यासाठी भारत सरकारने अनेक पावले उचलली आहेत. त्यातलेच एक महत्वाचे पाऊल म्हणजे खास महिलांना डोळयासमोर ठेवून विविध योजना आखल्या आहेत आणि एवढया वरच न थांबता, त्या योजना नीट राबवल्याही जात आहेत. त्यामुळे महिलांना आपली प्रतिभा दाखविण्याची आणि आपली ओळख निर्माण करण्यासाठी मोलाची मदत झाली आहे.

'सबल महिला बलवान भारत' हे महिला बॅंकेचे ब्रीदवाक्य आहे. प्रत्येक स्त्रीने आर्थिकदृष्टया सक्षम होणे ही गरज आहे. जास्तीत जास्त महिलांनी अद्योगाकडे वळणे ही काळाची गरज आहे. समाधानकारक गोष्ट म्हणजे व्यावसायभिमुख शिक्षणाकडे मूलींचा कल वाढतोय. उद्योगामध्ये सरकार दरबारी पुरूषांना मिळणाऱ्या सवलतीपेक्षा स्त्रियांना मिळणाऱ्या सवलती जास्त आहेत. अनेक सरकारी योजना मोठया प्रमाणात राबविल्या जातात, परंतु त्याची माहिती नसते. त्या वेळोवेळी माहिती करून घेणे महत्वाचे आहे घर संसार, मुलं यांची जबाबदारी सांभाळत व्यवसायात उतरणे आव्हानात्मक आहे. अशा वेळी सुरूवात गृहउद्योगातून केल्यास तारेवरची कसरत जमवण्यास सोपे जाते. 'बचत गट' ही संकल्पना एक सर्वसमावेशक आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात महिला आणि व्यवसाय यांची जणू एक चळवळ तयार झाली आहे. यातूनच आज तळागळातील ग्रामीण स्त्रीयां देखील आर्थिकदृष्टया सक्षम झाल्या आहेत.

१९ व्या शतकात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उद्योग धंद्यामध्ये स्त्रियांचा वाटा अत्यंत अल्प होता. तथापि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी स्त्रियांच्या औद्योगिक क्षेत्रातील सहभाग अत्यंत वेगाने वाढल्याचे दिसते. सध्या सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने त्या काम करीत असून औद्योगिक क्षेत्रातही त्या मागे नाहीत. विकसित व विकसनशील देशात व समाजात स्त्रिया स्वत: पुढाकार घेऊन उद्योगाची भूमिका पार पाडीत आहेत. मुलत: महिला उद्योजक ही संकल्पना उद्योजक या संकल्पनेहून वेगळी नाही. उद्योजकाची व्याख्या व कार्ये महिला अगर स्त्री उद्योजकांनाही लागू होतात. उद्योजकाच्या प्रमुख कार्यामध्ये नवनवीन कल्पनांचा शोध घेणे, त्यातून व्यावसायिक संधी शोधणे, संधीची नफ्याच्या दृष्टीने अनुकुलता तपासणे, निवड करणे, धोका पत्करणे, उद्योगाची स्थापना करणे, उद्योगास आवश्यक अशा सर्व घटकांची जमवाजमव करणे, उद्योगाचे व्यवस्थापन, नियंत्रण व नेतृत्व करणे या बाबींचा समावेश होतो. ज्या उद्योगव्यवसायात ही सर्व किंवा बहुसंख्य कार्य स्त्रीकडून किंवा स्त्रियांच्या समुहाकडून पार पाडली जातात, त्यास महिला उद्योग असे संबोधले जाते. भारत सरकारच्या नॅशनल लेव्हल स्टॅंडिंग कमिटी ऑन विमेन ऑन्त्रप्रनरशिप (१९९१) या समितीने निर्देशित केलेल्या व्याख्येनुसार, ज्या उद्योगात ५१ टक्के भागभांडवल स्त्रियांकडून गुंतविण्यात आलेले आहेत, तसेच ज्या उद्योगातील निर्माण झालेल्या रोजगाराच संधीपैकी किमान ५० टक्के रोजगार स्त्रियांनाच देण्यात आलेले आहेत, अशा उद्योगांना महिला उद्योग म्हटले आहे.

अलीकडे सर्वच विकसनशील देशांत स्त्री उद्योजकतेचा विकास करण्यासाठी सरकारी पातळीवरून विशेष प्रयत्न केले जात आहेत. सध्याच्या स्पर्धात्मक वातावरणात स्त्री उद्योजकतेला साहाय्य करणोर घटकही तितकेच महत्त्वाचे आहेत. यशस्वी उद्योजक होण्यासाठी आवश्यक असलेले अनेक गुण स्त्रियांमध्ये उपजतच असतात. नैसर्गिक क्षमता, शांत व सहनशील स्वभाव, तणाव व संकटे हाताळण्याची कसोशी, सत्तेमध्ये इतरांना सहभागी करून घेण्याची क्षमता अशा गुणवैशि टयांमुळे त्या त्यांचे कार्य कार्यक्षमतेने करू शकतात. समाजाचा स्त्रियांबाबतचा जो पारंपरिक दृष्टिकोण होता, त्यामध्ये आता झपाटयाने बदल घडून येत आहे. शिक्षणाचा प्रसार व स्त्रीशिक्षणाला दिले जाणारे प्राध्यान्य, उच्च व तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, नागरिकरण व स्वयंरोजगाराच्या संधीत होणारी वाढ या सामाजिक घटकांत होणारे बदलही त्यासाठी पोषक ठरतात. स्त्रियांचे

सामाजिक स्थान, आर्थिक स्वातंत्र्य, हक्क, सवलती याबाबत स्त्रियांच्या चळवळी उभ्या राहत आहेत. स्त्रियांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या अधिवेशनांमध्ये त्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चेद्वारे प्रबोधन करण्यात येत आहे. त्यामुळे स्त्रियांच्या उद्योजकता चळवळीला बळ मिळत आहे.

**उद्देश :**

१. आर्थिकदृष्टया महिलांना सक्षम करणे.

२. उद्योजकतेतून महिलांचे सबलीकरण करणे.

३. स्त्रियांमधील आत्मविश्वास दृढ करणे.

४. शासकिय योजनांबाबत माहिती करणे.

**गृहितके :**

१. आर्थिकदृष्टया महिला बऱ्याच प्रमाणात सक्षम झाल्या आहेत.

२. उद्योजकतेतून महिलांचे सबलीकरण झाल्याचे आहे असे निर्दशनास येते.

३. स्त्रियांमधील आत्मविश्वास वाढलेला दिसतो.

४. शासकीय योजनांबाबत महिला अनभिज्ञ आहेत.

**संशोधनाची मर्यादा:**

चंद्रपूर शहरातील उद्योग करणाऱ्या महिलांची निवड करण्यात आली. प्रस्तुत विषयाची मर्यादा चंद्रपूर शहरातील उद्योग करणाऱ्या महिलांपुरती मर्यादित आहे.

**अध्ययन क्षेत्र :**

प्रस्तुत अध्ययन क्षेत्रात चंद्रपूर शहरातील काही उद्योग करणाऱ्या एकूण ५० महिलांचा अभ्यास करण्यात आला.

**नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनात चंद्रपूर शहरातील महिलांची निवड करण्यात आली. संशोधनाकरिता नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला.

**तथ्य संकलन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनात महिला उद्योजकतेच्या माध्यमातून महिलांचे किती प्रमाणात सबलीकरण झाले हे माहिती करून घेण्यासाठी प्रश्नावली पध्दत तसेच मुलाखत पध्दतीचा अवलंब करून खालील घटकांच्या आधारे तथ्य संकलन करण्यात आले.

**सांख्यिकीय विश्लेषण:**

| अ.क्रं. | उद्योजकता आणि महिला सक्षमीकरण/संख्या ५० | प्रतिशत |
|---|---|---|
| १ | आर्थिकदृष्टया सक्षम | ९० टक्के |
| २ | डद्योजकतेतून सबलीकरण | ८० टक्के |
| ३ | कुटुंबाला आर्थिक मदत | १०० टक्के |
| ४ | महिलांमधील आत्मविश्वास | ९० टक्के |
| ५ | शासकीय योजनेबाबत माहिती | ६० टक्के |

**निष्कर्ष:—**

महिला उद्योजकतेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण ९० टक्के झाल्याचे निर्दशनास येते. १०० टक्के स्त्रीया या कुटूंबाला आर्थिक मदत करतात. महिलांमधील आत्मविश्वास हा फार मोठया प्रमाणात वाढल्याचे निर्दशनास येते. महिलांना शासकीय योजनेबाबत अनभिज्ञता असल्याचे दिसते.

शासनाने स्त्रियांच्या उद्योजकतेला साहाय्यक असणारे पूरोगामी धोरण व देऊ केलेल्या सवलती हा स्त्री उद्योजकतेच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा घटक आहे. आयआडीपी, नाबार्ड, स्टेट बॅक, स्त्री शक्ती योजना, विमेन डेव्हलपमेन्ट कॉपोरेशन, इंदिरा महिला केन्द्र, राष्ट्रीय महिला कोश, इंदिरा प्रियदर्शनी योजना, महिला उद्यम व महिला विकास निधी, वर्किंग विमेन फोरम या शासकीय योजनांद्वारे स्त्री उद्योजकता वाढीसाठी प्रयत्न केले जात आहे. स्त्रिया औद्योगिक क्षेत्रात आपले स्थान निर्माण करू लागल्या आहेत. पाश्चिमात्य देशाप्रमाणेच भारतातही महिला उद्योजकांची संख्या वाढत आहे. शिक्षणाच्या पुसारामुळे जगाकडे पाहाण्याची नवी दृष्टी व आव्हाने पेलण्यासाठी आवश्यक असा आत्मविश्वास या गोष्टी प्रामुख्याने नवीन महिला उद्योजक निर्माण होण्यास साहाय्यक ठरत आहेत. संपूर्ण क्षेत्रामध्ये महिलांचे अधिराज्य असल्यामुळे महिला उद्योजकाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण झाल्याचे निर्दशनास येत आहे.

**शिफारशी :–**

१. कुटूंबातून महिलांना पाठबळ मिळाले आहे.
२. स्वत:हा सक्षम होवून इतर वंचित स्त्रियांनाही सक्षम करावे.
३. स्त्री उद्योजकतेमध्ये प्रामाणिकपणा, संयम, आत्मनिर्भरता, असायला पाहिजे.
४. ग्रामीण महिलांना प्रशिक्षण देवून स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करायला पाहिजे. त्यांना कायदा, व्यापार व व्यवहारांचे ज्ञान देण्यात यावे.
५. अर्थाजनाच्या योग्य संधी उपलब्ध करून स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण करणे उपयुक्त आहे.
६. विविध शासकीय योजनांची माहिती ग्रामीण व शहरी महिलांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न व्हावा, जेणेकरून त्यांना त्यांचा लाभ घेता येईल.

**संदर्भ :**

१. उद्योजकता विकास संकल्पना व व्यवहार– डॉ. देशमुख, प्रभाकर
२. महाराष्ट्रातील महिला उद्योजक– प्रा. शैलजा सांगळे